Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक ३] शनिवार, जानेवारी २८, २०२३/माघ ८, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्स्थापना व पुनर्वसन व करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम १९ (१) अन्वये.—**

क्रमांक उजिभूकानाप्र-मं. अ.-कावि-२३१-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांने भूमि संपादन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त अधिनियम ” असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक-उजिभू-मं. अ.-कावि-४६-२०२१, अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे. तसेच, समूचित शासन तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. मं. अ.-उपजिभू-कानाप्र-कावि २३०-२२, दिनांक १० नोव्हेंबर २०२२ अन्वये सदरील अधिसूचना करण्याकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९, पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या प्रयोजनासाठी “ पुनर्वसन क्षेत्र ” म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), कान्होली नाला प्रकल्प, नागपूर यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०२-अ-६५-२०१८-२०१९, मौजा नंदापूर, तह. सावनेर, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | जमीन मालकाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | हे. आर |
| १ | ईश्वर लक्ष्मण ताजणे | १३४ | १ ६८ |
| २ | काशीराव श्रीपतराव ताजणे | १५६ | १ ३२ |
| ३ | धर्मरत्न उकंडराव लांजेवार, धिरज उकंडराव लांजेवार, प्रफुल नेपाल लांजेवार, राजेंद्र ओमकार लांजेवार | १३६/१ | ० ७५ |
| ४ | विठ्ठल दशरथ सोमकुंवर, ईश्वर दशरथ सोमकुंवर | १५५/अ | ० ९० |
| ५ | रमेश विठोबा चपट | १५५/ब/१ | १ ३६ |
| | | एकूण संपादनाखाली क्षेत्र . . | ६ ०१ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | कन्हान नदी प्रकल्प, (कोच्छी बॅरेज) |
| प्रकल्पाचे कामाचे विवरण | : | बुडीत क्षेत्राकरीता खाजगी जमीन ६.०१ हे. आर |
| प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे | : | सदर प्रकल्प योजनेमध्ये ५४.१९५ द.ल.घ.मी. पाणी साठा निर्मिती होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन**

संपादनामुळे भूधारक विस्थापीत होत नाही : निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

१. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प विभाग, नागपूर यांचे कडील पत्र जा. क्र. २६८९-चिशा-कोच्छी भूसंपादन-२०१८, दिनांक २० ऑगस्ट २०१८.

२. महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. जि. ओ. एस.-१०८१-(२३-१असंज, २ मंत्रालय, मुंबई) दिनांक ३१ मार्च १९८२.

संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ व तद्नंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

**टीप** : उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), कान्होली नाला प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ४.

## अधिसूचना

**भूमि संपादन, पुनर्स्थापना व पुनर्वसन व करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम १९ (१) अन्वये.–**

क्रमांक उजिभूकानाप्र-मं. अ.-कावि-२३१-२०२२.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक-उजिभू-मं. अ.-कावि-४२-२०२१, अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या शेत जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त शेत जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे. तसेच, समूचित शासन तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. मं. अ.-उपजिभू-कानाप्र-कावि २३०-२२, दिनांक १० नोव्हेंबर २०२२ अन्वये सदरील अधिसूचना करण्याकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९, पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसन क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), कान्होली नाला प्रकल्प, नागपूर यांना पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-अ-६५-२०२०-२०२१, मौजा रायवाडी, तह. सावनेर, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | जमीन मालकाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | हे. आर |
| १ | मयंक सुशीलकुमार तिवारी | १९० | ३ ५६ |
| २ | जिवन रायभान डहाट, खिरनाबाई चिंधबा बाकडे, वंदना रामदास डहाट, सुमध रामदास डहाट, विव्या रामदास डहाट | १९१ | १ ६७ |
| ३ | सुचिता रमाशंकर तिवारी, सुचित्रा रमाशंकर तिवारी | १९३ | २ २९ |
| | एकूण संपादनाखाली क्षेत्र . . | | ७ ५२ |

### अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | कन्हान नदी प्रकल्प, (कोच्छी बॅरेज) |
| प्रकल्पाचे कामाचे विवरण | : | बुडीत क्षेत्राकरीता खाजगी जमीन ७.५२ हे. आर |
| प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे | : | सदर प्रकल्प योजनेमध्ये ५४.१९५ द.ल.घ.मी. पाणी साठा निर्मिती होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन**

संपादनामुळे भूधारक विस्थापीत होत नाही : निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

१. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प विभाग, नागपूर यांचे कडील पत्र जा. क्र. ३०१२-चिशा-कोच्छी भूसंपादन-२०१९, दिनांक १९ नोव्हेंबर २०१९.

२. महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र. जि. ओ. एस.-१०८१-(२३/१ असंज, २ मंत्रालय, मुंबई) दिनांक ३१ मार्च १९८२.

संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ व तद्नंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

**टीप** : उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), कान्होली नाला प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

नागपूर :
दिनांक ११ नोव्हेंबर २०२२.

**डॉ. विपीन,**
जिल्हाधिकारी, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.